# वसई - विरार शहर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा

ठराव क्र. १६१७ दिनांक. ०३/०२/२०१४

प्रस्तावाचा विषय:- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ नुसार सन २०१३ - १४ चे सुधारित व सन २०१४-१५ चे मुळ अंर्थसंकल्पीय अंदाज तयार करुन मा. महासभेपुढे सादर करणेस शिफारस करणे.

प्रस्तावाचा मजकुर :- पी बजेट, जेंण्डर बजेट, अंध अपंग कल्याणाचे बजेटसह सर्वसाधारण 'अ' अथसंकल्प, जल मल प्रवाह निधी 'क' अर्थसंकल्प, वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्प, कर्ज निधी अर्थसंकल्प, सॅटेलाईट सिटी योजना, याबाबत आयुक्त यांनी सादर केलेली तपशिलवार माहिती, अंदाज व प्रस्ताव याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ मधील तरतुदीप्रमाणे सविस्तर विचार विमर्ष करुन मा. स्थायी समितीने सन २०१३-१४ च्या सुधारीत अर्थसंकल्पासह सन २०१४-१५ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाज तयार करणेस शिफारस आहे. या प्रस्तावानुसार शिफारशीसह केले जाणारे अंदाजपत्रक, मा. स्थायी समितीने ठराव क्र. १६१५ दि. ०३/०२/२०१४ अन्वये संमत करुन शिफारस केलेले परिवहन उपक्रमाच्या 'ब' अंदाजपत्रकासह एकत्रितपणे मा. महासभेपुढे सादर करणेकामी मान्यता मिळणेस शिफारस आहे.

निर्णय :- सन २०१३-१४ चे सुधारीत अर्थसंकल्प व सन २०१४-१५ चे पी बजेट, जेंण्डर बजेट, अंध अपंग कल्याणाचे बजेटसह सर्वसाधारण 'अ' अथसंकल्प, जल मल प्रवाह निधी 'क' अर्थसंकल्प, वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्प, कर्ज निधी अर्थसंकल्प, सॅटेलाईट सिटी योजना अंदाजपत्रक याबाबत मा.स्थायी समितीने दि.०३/०२/२०१४ ते दि. ०७/०२/२०१४ या कालावधीत सविस्तर चर्चा व विचार विमर्ष करुन खालीलप्रमाणे फेरबदलासह शिफारशी केल्या आहेत.

१) प्रस्तावाचे वाचन करताना अर्थसंकल्पातील मुद्रणदोष दुरुस्त करण्यात आले.

२) कोणत्याही प्रकारची कर, फी अथवा कर आणि फी चे दरातील वाढ न करता अर्थसंकल्प प्रस्तावित करणेत आला.

३) पारगमन / ट्रांझीट फी च्या प्रस्तावाबाबत पाठपुरावा करणेस प्रशासनास निर्देश देण्यात आले.

४) जाहिरात कर व जागा भाडे निश्चितीबाबत तात्काळ कार्यवाही करण्याचे तसेच विना परवानगी सार्वजनिक ठिकाणी लावण्यात आलेले होर्डींग्ज फलक इ. तात्काळ काढून टाकण्याचे निर्देश देण्यात आले.

५) रस्त्यावरील विक्रेत्यांची संख्या नियंत्रीत करुन नियोजीत पद्धतीने व्यवसायाची ठिकाणे निश्चित करुन रहदारीस अडथळा होणार नाही यादृष्टीने नियंत्रीत कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

६)	मैला सफाईकामी खाजगी शौचकुपांच्या मैला सफाईसाठी वर्षातुन एकदा मोफत सेवा व तद्नंतर पुर्व निश्चित दराने सेवा देण्याचे ठरवण्यात आले.

७)	अनधिकृत मालमत्तांच्या नळ जोडणीस शास्ती आकारण्याचा प्रस्ताव फेटाळण्यात आला.

८)	दफन भुमीतील अंत्यसंस्कारासाठी मागणीनुसार प्रत्येक अंत्यसंस्कारासाठी प्रत्येकी ₹ १०००/- देण्याची शिफारस करण्यात आली तद्वतच पर्यावरण संरक्षणासाठी अंत्यसंस्काराकरीता विद्युत दाहिनी व गॅस दाहिनीचा वापर करणेस प्रोत्साहीत करण्यासाठी मयत व्यक्तीचे निकटतम् नातेवाईकास मागणीनुसार प्रत्येक अंत्यसंस्कारासाठी ठोक ₹ १०००/- इतके तात्काळ अर्थसहाय्य देणेची तरतुद करणेत आली.

९)	मोनोरेल अथवा मेट्रोरेल याबाबतची व्यवहार्यता पडताळणी करुन याबाबतच्या सर्व्हेक्षण इत्यादी प्राथमिक खर्चासाठी ₹ १० कोटी तरतुद करुन रिंगरोड व मोनोरेल / मेट्रोरेल तरतुदी स्वतंत्र करण्यात आल्या.

१०)	मा. वृक्ष प्राधिकरण समितीने मागणी केलेल्या अतिरीक्त ₹ ७ कोटी ६५ लक्ष ऐवजी ₹ ५ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्याचे निश्चित करुन तद्नुसार एकूण ₹ ११ कोटी १० लक्ष ३६ हजार इतकी अंशदान तरतुद सन २०१४-१५ मध्ये करणेत आली.

११)	महिला बाल कल्याणकारी योजनेअंतर्गत विशेष बालकांच्या संगोपनासाठी पालकांना प्रती बालक, दरमहा ₹ १०००/- ठोक अनुदान, महिला व मुलीसाठींच्या आश्रमांना अनुदान, अनाथ आश्रमांना अनुदान, मोफत वैद्यकिय तपासणी करुन दातांची निगा राखणेसाठी पेस्ट व ब्रश देणे, महिलेच्या उत्पन्नावर अवलंबीत असलेल्या कुटुंबातील कुटुंबप्रमुख अथवा अन्य सदस्य १००% अथवा ८०% अपंग असल्यास अशा कुटुंबातील महिलांना विशेष अर्थसहाय्य अशा व्यक्तींना सामुदायीक विवाह सोहळ्यातील वर वधुसाठी निश्चित अनुदानाव्यतिरीक्त अतिरीक्त अर्थसहाय्य या नविन योजनांचा समावेश करण्यात येऊन अन्य उपयुक्त योजना वेळोवेळी अंमलात आणण्यास तसेच पुर्वीच्या योजना पुढे चालु ठेवण्यास मान्यता देण्यात आली.

१२)	महिला बचत गटांना महानगरपालिकेची समाज मंदीरे व सांस्कृतीक भवनाचे व्यवस्थापन सोपवण्यास शिफारस करण्यात आली.

१३)	जेष्ठ नागरीकांच्या नोंदणीकृत संस्थांना उद्यान देखभालीचा ठेका घेण्यासाठी प्राधान्य देण्याची शिफारस करण्यात आली.

१४)	विरंगुळा केंद्र बांधकामाऐवजी जेष्ठ नागरीकांसाठी विरंगुळा केंद्र व वृध्दाश्रमाचे व्यवस्थापनासाठी ₹ ५० लक्ष ७५ हजार तरतुद करण्यात आली.

१५)	अंध व अपंग व्यक्तींसाठी तीन चाकी सायकली, इतर आवश्यक साहित्याचे वाटप, आवश्यकतेनुसार सोबत्यासह प्रवास करणाऱ्यांना ५०% सुट, अपंगत्वाबाबतचे उपयुक्त दाखले मिळवून देण्यासाठी स्थानिक ठिकाणी शिबीराचे आयोजन, या योजनांसह वेळोवेळी अन्य उपयुक्त योजना वेळोवेळी अंमलात आणण्यास तसेच पुर्वीच्या योजना पुढे चालु ठेवण्यास मान्यता देण्यात आली.

१६) रेन वॉटर हार्व्हेस्टिंग व सौर उर्जा वापर प्रोत्साहन देण्याकरीता करातील २% सुटी व्यतिरीक्त एकूण खर्चाच्या २०% परंतु अधिकतम ₹ १ लक्ष इतका खर्च महानगरपालिकेमार्फत अदा करण्याची अनुक्रमे ₹ ४० लक्ष व ₹ २० लक्ष तरतुद करणेत आली.

१७) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळातील सेवा निवृत्त अधिकाऱ्याची सल्लागार म्हणून नियुक्ती करुन त्यांचे सल्यानुसार व नगररचना अधिकाऱ्यांचे शिफारशीनुसार रस्ते उड्डाणपुल व पादचारी पुलांसाठी विशेष पाठपुरावा करण्याचे निर्देश देण्यात आले.

१८) महानगरपालिकेने विकसीत केलेल्या मत्तांच्या ठिकाणी निधीचे नाव, कामाचा खर्च, काम पुर्णत्वाचा दिनांक व काम हाती घेतलेल्या निधीची नावे ठळकपणे नमुद करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच खाजगी ग्रंथालयांनी देखील ग्रंथालयात महानगरपालिकेमार्फत उपलब्ध करुन दिल्या गेलेल्या अनुदानाबाबत ठळक फलक लावण्याची अट अनुदान मंजुर करताना घालण्याचे निर्देश देण्यात आले.

१९) विकास कामांतर्गत नेहमीच्या नियमीत कामांव्यतिरीक्त गतीरोधक, सार्वजनीक ठिकाणी जागेच्या उपलब्धतेनुसार शौचालय मुतारी, रो - रा फेरी सेवा उपलब्ध करणेकामी आवश्यक तरतुद तसेच नालासोपारा येथील बौद्ध स्तुपापासुन २ कि.मी. च्या परिसरात तसेच वसई किल्ल्यालगतच्या २ कि.मी.च्या परिसरात स्वतंत्र व्यवस्थेअंतर्गत थ्री डी चीत्रफीतीद्वारे माहिती देण्यासाठी चलचित्रपट दर्शवणे, बैठक व्यवस्था, वाचनालय व्यवस्था इत्यादी उपलब्ध करणेकामी ऐतीहासीक मालमत्ता संवर्धन विषयक तरतुद करणेत आली.

२०) सामाजिक आकाशवाणी केंद्र व्यवस्थापन तरतुद रद्द करणेत आली.

२१) सुरक्षा व्यवस्थेअंतर्गत पोलिस ठाण्यांना सुरक्षा रक्षकासह महिला सुरक्षा वाहन पुरवणेची शिफारस करणेत आली.

२२) मच्छिमारांसाठी पिण्याचे पाणी शुध्द करण्याकरीता रसायन मिश्रीत गोळ्या व मच्छीमारांचा विमा या योजनांसह प्रस्तावित योजनांना मान्यता देऊन मच्छिमारांसाठी अन्य योजना वेळोवेळी अंमलात आणणेस मान्यता देण्यात आली.

२३) अभ्यासिका व्यवस्थापनामध्ये युवकांसाठी स्पर्धा परिक्षेची पुस्तके उपलब्ध करुन देणाऱ्या ग्रंथालयांना अभ्यासिकांसाठी प्रस्तावित साधनसामुग्री उपलब्ध करुन देण्याची शिफारस करण्यात आली.

२४) नालासोपारा येथील रुग्णालय खाजगी संस्थेमार्फत चालवणेसाठी अनुदान देणेची तरतुद; महानगरपालिका क्षेत्रातील रुग्णांसाठी श्वान दंश व सर्प दंश इंजेक्शन मोफत देणेची तरतुद, महानगरपालिकेच्या रुग्णालयात जेनेरीक मेडीसीन उपलब्ध करणेची तरतुद, डायलेसीस उपचारासाठी सर्व रुग्णालयांकडून याबाबतची दर पत्रके मागवुन त्यापैकी प्रतीरुग्ण कमाल ₹ ७५०/- पर्यंत दर घेणाऱ्या रुग्णालयांना प्रतीरुग्ण ₹ ३५०/- इतका खर्च महानगरपालिकेमार्फत अनुदान स्वरुपात देणेची महिला बालकल्याण योजना, युवक कल्याणकारी योजना व जेष्ठ नागरीकांसाठीच्या योजना यामध्ये तरतुद. महानगरपालिकेचे कर मुदतीत भरणाऱ्यांना हेल्थ कार्ड उपलब्ध करुन देऊन महानरगरपालिकेच्या रुग्णालयात रक्त तपासणी, ई.सी.जी, एक्सरे, इ.

तपासणीसाठी सर्वसामान्यांना ५०% सवलत तसेच अंध, अपंग, महिला व बालकांना १००% सवलत देण्याचे ठरवण्यात आले. डायलेसीससाठी महानगरपालिका ठरवुन देईल अशा दराने डायलेसीस करणाऱ्या रुग्णालयांना महानगरपालिकेमार्फत मशिन पुरविणे इत्यादीसह रुग्णालय व्यवस्थापनासाठी तरतुद. या तरतुदी करण्यात आल्या.

२५) सुजल निर्मल अभियान अंतर्गत जल व उर्जा लेखा परिक्षणासाठी ₹ ५.३७ लक्ष अनुदान व ₹ ७.६८ लक्ष खर्चाची तरतुद करण्यात आली.

२६) मत्स्य विकास महामंडळाकडून मार्केट विकासासाठी अनुदान, रिंगरोड, एकात्मिक तलाव संवर्धन योजना, पाणीपुरवठा योजना राजीव आवास योजना, या योजनांसाठी प्रकल्प खर्चानुसार अनुज्ञेय अनुदान, कर्जासह स्वनिधी, शेती कामांसाठी साहित्य विज पंप, फवारणी पंप, जंतुनाशके बियाणे, खत इत्यादी शेत काम साहित्य पुरवठा (पी बजेट), मच्छिमार आणि बोटीवरील मजुरांसाठी कल्याणकारी योजना (पी बजेट), याबाबतच्या वाढीव तरतुदीसह अन्य लेखाशिर्षनिहाय तरतुदीत वाढ अथवा घट करुन किंवा अन्य तपशिलात केलेले फेरफार नावासमोर अर्थसंकल्पात दर्शविल्याप्रमाणे आहेत.

२७) मा. स्थायी समितीने सुचविलेले लेखाशिर्षनिहाय फेरफार खालीलप्रमाणे आहेत.

| | जमा वाढ | सन २०१३-१४ | | | | सन २०१४-१५ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मा. स्थायी समितीने फेरफार सुचविलेले लेखाशिर्ष | आयुक्त यांनी प्रस्तावित केलेल्या तरतुदी | मा. स्थायी समितीने सुचविलेली वाढ | मा. स्थायी समितीने स्विकृत करुन शिफारस केलेली अंतीम रक्कम | | आयुक्त यांनी प्रस्तावित केलेल्या तरतुदी | मा. स्थायी समितीने सुचविलेली वाढ | मा. स्थायी समितीने स्विकृत करुन शिफारस केलेली अंतीम रक्कम |
| १ | कामगार कल्याण कर रिबेट | ० | ४५००००० | ४५००००० | | ० | ७२००००० | ७२००००० |
| २ | एकात्मिक तलाव संवर्धन योजना अनुदान | | | ० | | १७५०००००० | ५२५०००००० | ७००००००००० |
| ३ | मत्स्य विकास महामंडळ अनुदान | | | | | १२५००००० | २१०००००० | ३३५००००० |
| ४ | सॅटेलाईट सिटीमध्ये महानगरपालिका हिस्साकरीता अ अंदाजपत्रक नगररचना विभागाकडून जमा | | | ० | | ४३९९००००० | ११९७००००० | ५५९६००००० |
| ५ | जल मल प्रवाह निधीकडून अंशदान जमा सॅटेलाईट सिटी मध्ये | | | | | ० | १५०००००००० | १५०००००००० |
| ६ | सॅटेलाईट सिटी योजना राज्य शासनांचे अनुदान | | | | | ६४४८९५००० | २६९८००००० | ९१४६९५००० |
| ७ | सॅटेलाईट सिटी योजना केंद्र शासनांचे अनुदान | | | | | ५१५९१५९८०० | २१५८०००००० | ७३१७१५९८०० |
| ८ | पाण्यावरील विशेष कर | | | | | ४३४५६३००० | १४०००००० | ४४८५६३००० |
| ९ | जल मल मध्ये 'अ 'अंदाजपत्रक कडून जमा | | | | | ४७७३९६००० | ५८००००० | ४८३१९६००० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | सुजल निर्मल अभियान योजना अनुदान | | | | | ० | ५३७००००० | ५३७००००० |
| ११ | पाणीपुरवठा योजनेकरीता वित्तीय संस्थांकडील अर्थसहाय्य | | | | | ३००००००००० | १५००००००० | ३१५००००००० |
| १२ | वृक्षारोपन शुल्क वसुली | . | | | | ० | १००००० | १००००० |
| १३ | अं अंदाजपत्रकाकडून वृक्ष प्राधिकरणमध्ये जमा | | | | | ६१०३६००० | ५०००००००० | १११०३६००० |
| | **एकूण जमा वाढ** | ० | ४५००००० | ४५००००० | | १०४०४४४९८०० | ३५२४३०००००० | १३९२८७४९८०० |

| | जमा कपात | सन २०१३-१४ | | | | सन २०१४-१५ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **मा. स्थायी समितीने फेरफार सुचविलेले लेखाशिर्ष** | आयुक्त यांनी प्रस्तावित केलेल्या तरतुदी | मा. स्थायी समितीने सुचविलेली कपात | मा. स्थायी समितीने स्विकृत करुन शिफारस केलेली अंतीम रक्कम | | आयुक्त यांनी प्रस्तावित केलेल्या तरतुदी | मा. स्थायी समितीने सुचविलेली कपात | मा. स्थायी समितीने स्विकृत करुन शिफारस केलेली अंतीम रक्कम |
| १ | एकात्मिक तलाव संवर्धन योजना अनुदान | १७५०००००० | १७५०००००० | ० | | | | |
| २ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना | | | | | ८१०००००० | ११००००० | ८०९००००० |
| ३ | प्रवासी भाडे | | | | | ८९६६००००० | ५४६६००००० | ३५०००००० |
| ४ | जाहिरात उत्पन्न (वाहन, बस थांबे व तिकीटामागील जाहिरात) | | | | | ५६५००००० | ३७३००००० | १९२००००० |
| ५ | परिवहन उपक्रम बँक व्याज | | | | | १२७००० | ६४००० | ६३००० |
| ६ | परिवहन उपक्रम बालपोषण अधिभार सुट | | | | | ९०८००० | ८३६००० | ७२००० |
| ७ | परिवहन उपक्रम संगणकीकरण | | | | | १२०००००० | ९०००००० | ३०००००० |
| ८ | परिवहन उपक्रम इतर खर्च | | | | | ३११०००० | १०००० | ३१००००० |
| ९ | बस ऑपरेटर फी | | | | | ८५९५७५००० | ५३४०७५००० | ३२५५००००० |
| १० | बसभाडे वसुलीसाठी होणारा खर्च | | | | | १७१९१५००० | १०६८१५००० | ६५१००००० |
| ११ | परिवहन उपक्रम बालपोषण अधिभार व प्रवासी कर जमा | | | | | ४५४०००००० | ४१८०००००० | ३६०००००० |
| | **एकूण जमा कपात** | १७५०००००० | १७५०००००० | ० | | २९६४१३५००० | १३५८६०००००० | १६०५५३५००० |

| | खर्च वाढ | सन २०१३-१४ | | | | सन २०१४-१५ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मा. स्थायी समितीने फेरफार सुचविलेले लेखाशिर्ष | आयुक्त यांनी प्रस्तावित केलेल्या तरतुदी | मा. स्थायी समितीने सुचविलेली वाढ | मा. स्थायी समितीने स्विकृत करुन शिफारस केलेली अंतीम रक्कम | | आयुक्त यांनी प्रस्तावित केलेल्या तरतुदी | मा. स्थायी समितीने सुचविलेली वाढ | मा. स्थायी समितीने स्विकृत करुन शिफारस केलेली अंतीम रक्कम |
| १ | सामान्य प्रशासन कर्मचारी वेतन व भत्ते | १०६५२७००० | ५१०००००० | १५७५२७००० | | | | |
| २ | सामान्य प्रशासन झेरॉक्स खर्च | ८०००० | १००००० | १८०००० | | | | |
| ३ | सामान्य प्रशासन इ-गव्हर्नस अंमलबजावणी | ४२००००० | १६००००० | ५८००००० | | | | |
| ४ | सामान्य प्रशासन वातानुकूलीत यंत्रणा (खरेदी) दुरुस्ती | १६००००० | ३००००० | १९००००० | | | | |
| ५ | सामान्य प्रशासन नविन झेरॉक्स मशिन (खरेदी) दुरुस्ती | १७५०००० | ५००००० | २२५०००० | | | | |
| ६ | सामान्य प्रशासन अतिथ्य खर्च | २७५००० | २२५००० | ५००००० | | | | |
| ७ | सामान्य प्रशासन इतर खर्च | २२५००० | ३६५००० | ५९०००० | | | | |
| ८ | परिभाषीत अंशदान निधी नगरपरिषद हिस्सा | ३६००००० | २००००० | ३८००००० | | | | |
| ९ | स्थानिक संस्था कर महसुल तिकीटे | १०००० | १०००० | २०००० | | | | |
| १० | अग्निशमन व्यवस्था साहित्य खरेदी | १५००००० | १६००००० | ३१००००० | | | | |
| ११ | साफसफाई स्थायी आस्थापना | ११०७००००० | १८२००००० | १२८९००००० | | | | |
| १२ | साफसफाई साहित्य खरेदी | २५००००० | १०००००० | ३५००००० | | | | |
| १३ | सायकल (खरेदी) व दुरुस्ती | २५००० | १०००० | ३५००० | | | | |
| १४ | विरंगुळा केंद्र, वृद्धाश्रम व्यवस्थापन देखभाल | २५००० | १००००० | १२५००० | | ७५००० | ५०००००० | ५०७५००० |
| १५ | देव देवतांच्या मुर्ती विसर्जन तराफे दुरुस्ती | ३५००० | ८०००० | ११५००० | | | | |
| १६ | समाज मंदिर विद्युत देयके | २२०००० | ३०००० | २५०००० | | | | |
| १७ | शाळा इमारती दुरुस्ती | १०००००० | ३००००० | १३००००० | | | | |
| १८ | बांधकाम विभाग संकीर्ण | २५००० | ८०००० | १०५००० | | | | |
| १९ | देव देवतांच्या मुर्ती विसर्जन तराफे बनविणे | ३५००००० | ८००००० | ४३००००० | | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २० | राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना अनुदानासह महानगरपालिका अंशदानातून तलाव सुशोभिकरण करणे | | | | | ५००००००० | ५००००००० | १०००००००० |
| २१ | पाणीपुरवठा कर्मचारी सानुग्रह अनुदान | ९१०४७ | ७४८९७९ | ८४००२६ | | ७३०००० | ४००००० | ११३०००० |
| २२ | टँकरद्वारे पाणीपुवठा | ४४१०००० | १००००० | ४५१०००० | | | | |
| २३ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत सुर्या विस्तारित १०० द.ल.ली. पाणीपुरवठा योजना | | | | | १७३००००००० | ७८६३००००० | २५१६३००००० |
| २४ | विकास निधी अंतर्गत सूर्या योजना इतर भांडवली कामे | २५००००० | ५००००० | ३०००००० | | | | |
| २५ | कार्यालयीन कामाचे आय.एस.ओ प्रमाणपत्र घेणे क्रेडीट रेटींग करुन घेणे | | | | | १८००००० | २५००००० | ४३००००० |
| २६ | सौर उर्जा वापर | | | | | ० | २५००००० | २५००००० |
| २७ | रुग्णालय संचालन अनुदान | | | | | ० | १०००००० | १०००००० |
| २८ | सर्व धर्मीयांच्या दफनविधीकरीता अनुदान | | | | | ० | २००००० | २००००० |
| २९ | अ अंदाजपत्रक कडून जल मल प्रवाह निधी अंशदान (क अंदाज पत्रक) | | | | | ४७७३९६००० | ५८००००० | ४८३१९६००० |
| ३० | अ अंदाजपत्रक कडून यु.आय.डी. एस.टी. बजेटकडे अंशदान | | | | | ४३९९००००० | ११९७००००० | ५५९६००००० |
| ३१ | अ अंदाजपत्रक कडून वृक्ष प्राधिकरण अंशदान | | | | | ६१०३६००० | ५०००००० | १११०३६००० |
| ३२ | रेन वॉटर हार्वेस्टिंग | | | | | ० | २५००००० | २५००००० |
| ३३ | मोनोरेल प्रकल्प | | | | | ० | १००००००० | १००००००० |
| ३४ | विकास निधी अंतर्गत सर्व धर्मीयांच्या नवीन दहन व दफनभूमीसाठी भुसंपादन व विकासासह अस्तित्वातील दहन व दफन भूमींचा विकास तसेच विद्युत व गॅस दाहिनी व्यवस्था | | | | | २००००००० | ५०००००० | २५०००००० |
| ३५ | विकास निधी अंतर्गत आवश्यक तेथे शित गृहासह बहुद्देशिय मार्केट बांधकाम | | | | | ३०००००० | २१०००००० | ५१०००००० |
| ३६ | रुग्णालयासाठी यंत्रे व इतर साधने | | | | | १३०००००० | १०००००० | २३०००००० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३७ | यु. आय. डी. एस. एस. टी / यु. आय. डी. एस. एस. एम. टी. योजनेअंतर्गत १४९५ कोटीची शहरांतर्गत पाणीपुरवठा योजना | | | | | २३९५०००००० | २८३७५००००० | ५२३२५००००० |
| ३८ | जल व उर्जा लेखापरिक्षण | | | | | २०००००००० | ५६८०००००० | ७६८०००००० |
| ३९ | सार्वजनीक विहीरी गाळ काढणे व दुरुस्ती | | | | | ४५०००००० | ५५०००००० | १०००००००० |
| ४० | क अंदाजपत्रकाकडून सॅटेलाईट सिटीकडे अंशदान | | | | | ० | १५००००००० | १५००००००० |
| ४१ | विकास निधी अंतर्गत बंधारे हस्तांतरण | | | | | ५०००००० | १०००००० | १५०००००० |
| ४२ | बोअरवेल खोदाई | | | | | १३५०००००० | ४६५०००००० | ६०००००००० |
| ४३ | गटारे बांधणे | | | | | ५००००००००० | ६०००००००० | ५६०००००००० |
| ४४ | वृक्षारोपन अनुदान प्रदान | | | | | ० | १००००० | १००००० |
| ४५ | झाडांसाठी पिंजरे खरेदीसह वृक्ष निधी अंतर्गत भाडवली कामे | | | | | ७२५०००००० | ५०००००००० | १२२५०००००० |
| ४६ | बस डेपो बांधकाम | | | | | ३२००००००० | ५६१०००००० | ३७६१०००००० |
| ४७ | परिवहन उपक्रम संगणक खरेदी | | | | | ३०००००००० | ९०००००००० | १२०००००००० |
| ४८ | शेती कामांसाठी साहित्य विज पंप, फवारणी पंप, जंतुनाशके बियाणे, खत इत्यादी शेत काम साहित्य पुरवठा (पी बजेट) | | | | | २०००००००० | ३०००००००० | ५०००००००० |
| ४९ | मच्छिमार आणि बोटीवरील मजुरांसाठी कल्याणकारी योजना (पी बजेट) | | | | | २५०००००० | २५०००००० | ५०००००० |
| | **एकूण खर्च वाढ** | २४४७९८०४७ | ७७८४८९७९ | ३२२६४७०२६ | | ६८३६९३७००० | ५०६०९००००० | ११८९७८३७००० |

| | खर्च कपात | सन २०१३-१४ | | | | सन २०१४-१५ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मा. स्थायी समितीने फेरफार सुचविलेले लेखाशिर्ष | आयुक्त यांनी प्रस्तावित केलेल्या तरतुदी | मा. स्थायी समितीने सुचविलेली वाढ | मा. स्थायी समितीने स्विकृत करुन शिफारस केलेली अंतीम रक्कम | | आयुक्त यांनी प्रस्तावित केलेल्या तरतुदी | मा. स्थायी समितीने सुचविलेली वाढ | मा. स्थायी समितीने स्विकृत करुन शिफारस केलेली अंतीम रक्कम |
| १ | सामान्य प्रशासन संगणक चालक/संगणकीय व्यवस्थापन ठेका | ३१८००००० | ७००००० | ३११००००० | | | | |
| २ | दिवाबत्ती व्यवस्थापन ठेका | १५०००००० | ९००००० | १४१००००० | | | | |
| ३ | शहरातील नागरीकांसाठी जनता अपघाती विमापत्र घेणे / त्या धर्तीवर तत्सम विमालाभ देणे | २००००००० | २००००००० | ० | | | | |
| ४ | रस्ता बांधकामे | ९६००००००० | ५४८००००० | ९०५२००००० | | ९४५७००००० | २४३२००००० | ७०२५००००० |
| ५ | विरंगुळा केंद्र व्यवस्थापन | १००००० | १००००० | ० | | ५०००००० | ५०००००० | ० |
| ६ | राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना अनुदानासह महानगरपालिका अंशदानातून तलाव सुशोभिकरण करणे | १९०६००००० | ९०६००००० | १००००००००० | | | | |
| ७ | पाणीपुरवठा स्थायी आस्थापना | २२३५०००० | ७४८९७९ | २१६०१०२१ | | २६८५०००० | ४००००० | २६४५०००० |
| ८ | नाले खोदाई | ५९५००००० | ७८००००० | ५१७००००० | | ५९५००००० | १९५००००० | ४०००००००० |
| ९ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत सुर्या विस्तारित १०० द.ल.ली. पाणीपुरवठा योजना | १०९००००००० | ७९००००००० | ३०००००००० | | | | ० |
| १० | दिवे व इतर वस्तु यांची खरेदी दुरुस्ती, लेबर चार्ज व इतर चार्ज, मोटर पंप व फॅन दुरुस्ती | | | | | ९००००००० | ३००००००० | ६००००००० |
| ११ | घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत अनुदानासह रस्ता, गटारे, नाले, सार्वजनिक ठिकाणे इ. साफसफाईसाठी घंटा गाडी, यांत्रीक झाडू उपलब्ध करणेसह सफाई ठेका व भाडयाच्या वाहनाव्दारे यांत्रिक पध्दतीने नाले सफाई | | | | | ८७७५००००० | १२००००००० | ७५७५००००० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | मालमत्ता करदात्याच्या कुटूबांसाठी वैयक्तिक अपघात संरक्षण योजना | | | | | २०००००० | २०००००० | ० |
| १३ | यु. आय. डी. एस. एस. टी / यु. आय. डी. एस. एस. एम. टी. योजनेअंतर्गत भुयारी गटार योजना खर्च | | | | | ३८३५९०७००० | १४००००००० | ३६९५९०७००० |
| १४ | शहरांतर्गत वितरण व्यवस्था दैनंदिन देखभालीसाठी साहित्य खरेदी | | | | | ३७५००००० | ७५००००० | ३००००००० |
| १५ | सुर्या योजना दुरुस्ती देखभाल | | | | | ३००००००० | १००००००० | २००००००० |
| १६ | विकास निधी अंतर्गत पाणीपुरवठा योजना मुख्य जलवाहीनी व्यवस्था | | | | | ६११००००० | ४११००००० | २००००००० |
| १७ | विकास निधी मधुन पाणी पुरवठा शहरांतर्गत जलवाहीनी व्यवस्था | | | | | ३००००००० | १५०००००० | १५०००००० |
| १८ | वसई रोड(पेल्हार)प्रादेशिक ग्रामिण नळ पाणी पुरवठा योजनेवरील खर्च | | | | | २५०००००० | २४००००० | २२६००००० |
| १९ | परिवहन उपक्रम बालपोषण अधिभार व प्रवासी कर खर्च | | | | | ४५४००००० | ४१८००००० | ३६००००० |
| २० | इतर विकास कामे (पी बजेट) | | | | | ३७३००००० | ३२५००००० | ४८००००० |
| | **एकूण खर्च कमी** | २३८९३५०००० | ९६५६४८९७९ | १४२३७०१०२१ | | ६१०८७५७००० | ७१०४००००० | ५३९८३५७००० |

३०) अर्थसंकल्पासोबत सादर केलेल्या सबसीडी अहवालासह इतर सहपत्र तसेच मा. स्थायी समितीने अंतीमत मान्य करुन शिफारस केलेल्या लेखाशिर्षनिहा तरतुदींचा तपशिल अर्थसंकल्पाच्या प्रतीत नमुद करणेत आला असुन सदर अर्थसंकल्पाची प्रत हा या ठरावाचा भाग मानला जाईल.

मा. स्थायी समिती ठराव क्र. १६१५ दिनांक ०३/०२/२०१४ ने संमत करुन शिफारस केलेल्या परिवहन उपक्रमाचे मुळ 'ब' अंदाजपत्रक तसेच उपरोक्त फेरफारासह मा. स्थायी समितीने तयार करुन मा. महासभेपुढे सादर करणेस शिफारस केलेल्या सन २०१३-१४ चे सुधारीत अर्थसंकल्प व सन २०१४-१५ चे मुळ पी बजेट, जेंण्डर बजेट, अंध अपंग कल्याणाचे बजेटसह

सर्वसाधारण 'अ' अथसंकल्प, जल मल प्रवाह निधी 'क' अर्थसंकल्प, वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्प, कर्ज निधी अर्थसंकल्प, सॅटेलाईट सिटी योजना अंदाजपत्रक या सर्वांचा एकत्रित अर्थसंकल्पीय गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

(₹ लाखात)

| लेखाशिर्ष | सुधारीत अर्थसंकल्प सन २०१३-१४ | मुळ अर्थसंकल्प सन २०१४-१५ |
|---|---|---|
| प्रारंभिक शिल्लक | ६६४४३.३६ | ४४०२७.०० |
| **जमा रकमा** | **१००४३६.६४** | **२६४२७४.००** |
| **प्रारंभिक शिलकेसह एकूण जमा रकमा** | **१६६८८०.००** | **३०८३०१.००** |
| वर्ग जमा रकमा | ५४४२८.८० | ४५३७२.६४ |
| **खर्च रकमा** | **१२२८५३.००** | **३०००७६.००** |
| वर्ग खर्च रकमा | ५४४२८.८० | ४५३७२.६४ |
| अखेर शिल्लक | ४४०२७.०० | ८२२५.०० |

सुचकाचे नाव :- श्री. उमेश नाईक
व स्वाक्षरी :-

अनुमोदकाचे नाव :- डॉ. श्री. हेमंत पाटील
व स्वाक्षरी :-

अनुकुल संख्या :- प्रतिकुल संख्या :- तटस्थ संख्या:-

ठराव सर्वानुमते मंजूर

(अजीव यशवंत पाटील)
सभापती तथा पिठासीन प्राधिकारी
स्थायी समिती
वसई विरार शहर महानगरपालिका